जा.क्र. प्राअवि/एनसीटीई/२००५-०६/३४-ट/
महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन
व प्रशिक्षण परिषद, पुणे ३०.
दिनांक :- २६/ ८/२००५

प्रति,

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 30. | 122254 | MODERN EDUCATION SOCIETYCOLLEGE OF EDUCATION, A/P VITA, TAL. KHANAPUR SANGLI 415311 MAHARASHTRA | D.ED. | 50 | 2005-2006 |

विषय :- **सन २००५-०६ या वर्षाकरिता नवीन अध्यापक विद्यालयास मान्यतेबाबत**

संदर्भ :- एन.सी.टी.ई. भोपाळ यांचे पत्र दिनांक ९.८.०५

एन.सी.टी.ई. भोपाळ यांनी उपरोक्त संदर्भीय पत्रान्वये आपल्या संस्थेत नवीन अध्यापक विद्यालय सुरु करण्यासाठी काही अटी आणि शर्तीच्या अधीन राहून सन २००५-०६ पासून नवीन अध्यापक विद्यालयास परवानगी देण्यात आलेली आहे. अटी आणि शर्ती पुढीलप्रमाणे -

१) एन.सी.टी.ई. भोपाळ यांनी विहित केलेल्या निकषांचे तंतोतंत पालन होईल याची दक्षता घेण्यात यावी.
२) विहित अर्हताधारक व अनुभवी प्राचार्य व अध्यापक यांची महाराष्ट्र शासनाच्या निकषानुसार व खाजगी शाळा सेवा शर्ती १९८१ च्या नियमावलीनुसार नेमणूक केली जाईल.
३) नेमलेल्या सर्व सेवकांना विभागीय उपसंचालक यांची मान्यता घेतली जाईल.
४) प्रवेशाच्यावेळी प्रचलित शासन धोरणनुसार व महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेच्या मार्गदर्शक सुचनानुसार प्रवेश करण्यात येतील.
५) जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेशी सातत्याने संपर्क ठेवून आवश्यक ते मार्गदर्शन घेतले जाईल.
६) डी.एड्. विनियमन प्राधिकरण, पुणे (व्दारा - महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे-३०) यांचेकडून ३१ ऑगस्ट पूर्वी शुल्क निश्चित करुन घेतले जाईल.
७) व्यवस्थापन कोटा भरताना कोणतेही शासकीय नियमांचे उल्लंघन होणार नाही याची दक्षता घेतली जाईल.
८) व्यवस्थापन कोटयातील प्रवेश देताना कोणाही उमेदवारांकडून डोनेशन (donation) घेतले जाणार नाही किंवा अन्य कोणतीही तक्रार येणार नाही याची काळजी घेतली जाईल.
९) दरवर्षी एन.सी.टी.ई.ला स्टाफ प्रोफाईल विहित नमुन्यात संचालकांच्या प्रतिस्वाक्षरीसह सादर केली जाईल.
१०) महाराष्ट्र शासनाने ठरवून दिलेला अभ्यासक्रम, मूल्यमापन पध्दती, प्रात्यक्षिक कार्य इ.बाबींचे काटेकोरपणे पालन केले जाईल.

११) फी बाबतचा प्रस्ताव त्वरीत विभागीय शिक्षण उपसंचालक यांचेकडे तातडीने पाठवावा. त्याशिवाय staff profile चे प्रस्ताव स्वीकारले जाणार नाहीत.

१२) अ.वि. चालवताना ते सुरळीत चालावे म्हणून वेळोवेळी संबंधित जिल्हयाचे प्राचार्य, डाएट, विभागीय शिक्षण उपसंचालक, संचालक, म.रा.शै.सं.प्र.प. यांचे यथावकाश मार्गदर्शन घेतले जाईल.

| संस्थेचे नाव | अध्यापक विद्यालयाचे नाव | माध्यम | प्रकार | प्रवेश क्षमता | मान्यतेचे वर्ष |
|---|---|---|---|---|---|
| मॉडर्न एज्युकेशन सोसायटी, विटा खानापूर, जि. सांगली | मॉडर्न एज्यु. सोसायटीचे अ.वि. विटा खानापूर, सांगली | मराठी | मिश्र | ५० | २००५-०६ |

संचालक
महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व
प्रशिक्षण परिषद, पुणे ३० करिता.

प्रत : १. मा. सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई-३२ यांना माहितीस्तव सादर.

२. विभागीय शिक्षण उपसंचालक ---कोल्हापूर--- विभाग --कोल्हापूर-- यांना कार्यवाहीसाठी.

३. प्राचार्य, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था ---सांगली--------- यांना पुढील कार्यवाहीसाठी.

४. संचालक, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, १७ डॉ.आंबेडकर मार्ग, पुणे-१